# नवी मुंबई महानगरपालिका

## सन २००५-२००६ च्या सुधारीत आणि सन २००६-२००७ च्या

## अर्थसंकल्प "अ " आणि "क" यावरील मा. महापौरांचे निवेदन

स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९६ अन्वये सन २००५-२००६ चा सुधारीत आणि सन २००६-२००७ चा नवी मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प "अ " आणि "क" तयार करुन महानगरपलिकेच्या दिनांक २८ मार्च २००६ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विचारार्थ मांडला होता. सदर अर्थसंकल्पावर विचार करण्यासाठी महानगरपालिकेने दिनांक २९ मार्च २००६ रोजी विशेष सभेचे आयोजन केले होते. एकाच अर्थसंकल्पीय वर्षामध्ये चालू अर्थसंकल्पीय वर्षाचा म्हणजेच सन २००५-२००६ चा अर्थसंकल्प "अ " आणि "क" आणि पुढील अर्थसंकल्पीय वर्षाचा म्हणजेच सन २००६-२००७ चा अर्थसंकल्प मंजूर करण्याचा योगायोग प्राप्त झाला याबद्दल मला मनोमन आनंद वाटतो. महानगरपालिकामध्ये बहुतांश सदस्य प्रथमच नगरसेवक म्हणून आले असले तरी त्यांनी दोन्ही वेळा अर्थसंकल्पावर चर्चा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आलेल्या संधीचे प्रत्येक नवीन सदस्याने सार्थक केले. सदस्यांनी अर्थसंकल्पावर चर्चा करताना अत्यंत महत्वाच्या लोकोपयोगी कामाबद्दल जागरुकता ठेवून आपल्या मोलाच्या सूचना केल्या. अर्थसंकल्पावर चर्चा करुन ब-याच सदस्यांनी अर्थसंकल्पातील तरतुदीमध्ये बरेच फेरबदल सुचविले. अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये केलेले फेरबदल सभागृहाला अत्यंत मार्गदर्शक ठरले. त्यामुळेच नवी मुंबईच्या जनतेच्या आशा-आकांक्षा पुर्ण करणारा सन २००५-२००६ चा सुधारीत अर्थसंकल्प आणि सन २००६-२००७ चा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प आशादायी आणि भरगच्च तयार होऊ शकला.

सर्व प्रथम सन २००५-२००६ च्या सुधारीत महसूली आणि भांडवली खर्चाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये जे फेरबदल करण्यात आले त्याचा तपशीलवार तक्ता खालीलप्रमाणे आहे :-

सन २००५-२००६ चा सुधारीत अर्थसंकल्प "अ" आणि "क" मधील फेरबदल"

**(तक्ता क्र. १)** **(रुपये लाखात)**

| अ.क्र. | लेखा शिर्ष | स्थायी समितीने प्रस्तावित केलेली तरतूद | घट | वाढ | सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १ | भुखंड खरेदी | १९३.८५ | १२५.०० | | ६८.८५ |
| २ | अतिक्रमण पथक | ७०.०० | ४६.०० | | २४.०० |
| ३ | रस्ते, फुटपाथ, गटारे दुरुस्ती देखभाल | १००९.४४ | १०२.८८ | | ९०६.५६ |
| ४ | रस्ते, फुटपाथ, गटारे बांधणे | ३४२४.४१ | १०००.०० | | २४२४.४१ |
| ५ | TTC रस्ते, फुटपाथ, गटारे बांधणे | २५०.०० | २३६.५५ | | १३.४५ |
| ६ | चौकांचे सुशोभीकरण | १४०.७४ | ५०.०० | | ९०.७४ |
| ७ | स्ट्रीट फर्निचर | १०७.५४ | १००.०० | | ७.५४ |
| ८ | साफसफाई कंत्राट खर्च | १५३८.०८ | १००.०० | | १४३८.०८ |
| ९ | कचरा वाहतूक खर्च | ७१०.०५ | २००.०० | | ५१०.०५ |
| १० | डेब्रीज उचलणे | १००.०० | ७५.०० | | २५.०० |
| ११ | सार्वजनिक शौचालय बांधणे | ५५६.०१ | १५०.०० | | ४०६.०१ |
| १२ | अग्नीशमन दल वाहन खरेदी | १९८.४५ | २८.१८ | | १७०.२७ |
| १३ | नवीन जलकुंभ बांधणे | २४१.३२ | ३०.०० | | २११.३२ |
| १४ | नवीन जलवाहिन्यांची कामे | ४६२.१ | २५.०० | | ४३७.१० |
| १५ | पोर्टेबल पंप खरेदी | ४८.०० | | २८.१८ | ७६.१८ |
| १६ | TTC रस्ते, फुटपाथ, गटारे दुरुस्ती देखभाल | १७३.१७ | | २.८८ | १७६.०५ |
| १७ | शिक्षण मंडळ अनुदान | ५६०.०० | | १८१.५६ | ७४१.५६ |
| १८ | राज्य शिक्षण कर शासन भरणा | १७००.६३ | | ६५२.८५ | २३५३.४८ |
| १९ | रोजगार हमी कर भरणा | ३४६.५२ | | २.१४ | ३४८.६६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | पाणी विकत घेणे | ५२०५.०० | | ३२५.०० | ५५३०.०० |
| २१ | अनधिकृत बांधकामे हटविणे खर्च | ९०.०० | | ४६.०० | १३६.०० |
| २२ | नवीन पंपींग मशीनरी | १५० | | ३०.०० | १८०.०० |
| २३ | धरण विकत घेणे | ५४०३.४९ | | १०००.०० | ६४०३.४९ |
| | **एकुण** | | २२६८.६१ | २२६८.६१ | |

सन २००५-२००६ च्या सुधारीत अर्थसंकल्प "अ" आणि "क" मधील खर्चाच्या बाजूकडे वरील तक्त्यामध्ये जो फेरबदल करण्यात आला आहे तो ३१ मार्च २००६ अखेरपर्यंत प्रत्यक्षरित्या होणारा खर्च लक्षात घेऊन त्यामध्ये घट आणि वाढ सुचविलेली आहे. वर नमुद केल्याप्रमाणे सन २००५-२००६ या एकाच अर्थसंकल्पीय वर्षामध्ये सभागृहाने मूळ अर्थसंकल्पावर आणि सुधारीत अर्थसंकल्पावर विचार केला आहे. असे असूनही काही लेखाशीर्षकाखाली केलेली तरतूद पुरेपूर वापरली जाणार नाही असे लक्षात आले. तसेच काही लेखाशीर्षकाखाली केलेल्या तरतूदीपेक्षा प्रत्यक्षात त्या लेखाशीर्षकाखाली जादा खर्च झालेला आहे. सन २००५-२००६ ची वर्षा अखेरची शिल्लक रुपये १३२ कोटी १९ लाख २७ हजार यामध्ये कोणतेही फेरबदल न करता वर नमूद केलेल्या तक्त्यांमध्ये तपशीलवार दिल्याप्रमाणे अनुक्रमांक १ ते १४ यावर नमूद केलेल्या लेखाशीर्षकाखाली तरतुदींमध्ये घट करण्यात आली आहे. अशारितीने उपलब्ध झालेली रक्कम अनुक्रमांक १५ ते २३ यावर नमूद केलेल्या लेखाशीर्षकाखाली केलेल्या तरतुदींमध्ये वाढ करण्यात आली आहे. यामधील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत :-

भुखंड खरेदीसाठी सन २००५-२००६ करीता १ कोटी ९३ लाख ८५ हजार रुपयाची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात ६८ लाख ८५ हजार खर्च होत आहे त्यामुळे या लेखाशीर्षकाखाली १ कोटी २५ लाखाची घट करण्यात आलेली आहे.

रस्ते, फुटपाथ, गटारे दुरुस्ती देखभाल या लेखाशीर्षकाखाली सन २००५-२००६ करीता रुपये १० कोटी ९ लाख ४४ हजार इतकी तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात रुपये ९ कोटी ६ लाख ५६ हजार खर्च होत आहे. त्यामुळे सदर लेखाशीर्षकाखाली तरतुदींमध्ये १ कोटी २ लाख ८८ हजार रुपयाची घट केली आहे.

रस्ते, फुटपाथ, गटारे बांधणे या लेखाशीर्षकाखाली देखील रुपये ३४ कोटी २४ लाख ४१ हजाराची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात रुपये २४ कोटी २४ लाख ४१ हजार खर्च होत आहे त्यामुळे सदर लेखाशीर्षकाखाली रुपये १० कोटीची घट सुचविली आहे.

T.T.C. रस्ते, फुटपाथ, गटारे बांधणे या लेखाशीर्षकाखाली रुपये २ कोटी ५० लाखाची तरतूद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात केवळ रुपये १३ लाख ४५ हजार इतका खर्च झाला आहे. म्हणून या लेखाशीर्षकाखाली २ कोटी ३६ लाख ५५ हजार रुपयाची घट दर्शविली आहे. अशाच रितीने स्ट्रीट फर्निचर, साफसफाई कंत्राट या लेखाशीर्षकाखाली देखील प्रत्येकी रुपये १-१ कोटीची घट दाखविली आहे. तसेच कचरा वाहतूक खर्च या लेखाशीर्षकाखाली रुपये २ कोटीची घट दाखविण्यात आली आहे.

सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी जरी रुपये ५ कोटी ५६ लाख १ हजार इतकी तरतूद केली असली तरी प्रत्यक्षात रुपये ४ कोटी ६ लाख १ हजार इतका खर्च होत असून यामधून देखील रुपये १ कोटी ५० लाखाची बचत होत असल्यामुळे घट म्हणून दाखविण्यात आली आहे.

सन २००५-२००६ च्या सुधारीत अर्थसंकल्पामध्ये तरतुदींपेक्षा जास्त खर्च होत असणा-या लेखाशीर्षकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

शिक्षण मंडळ अनुदान म्हणून रुपये ५ कोटी ६० लाखाची तरतूद करण्यात आली असताना पगार इत्यादीसारखा अत्यावश्यक खर्च रुपये १ कोटी ८१ लाख ५६ हजाराने वाढल्यामुळे या लेखा शीर्षकाखाली रुपये १ कोटी ८१ लाख ५६ हजाराची वाढ सुचविली आहे. त्याचप्रमाणे राज्य शिक्षण करापोटी शासनाला द्यावयाच्या रकमेसाठी १७ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात २३ कोटी ५३ लाख ४८

हजारा इतकी रक्कम शासनाला देय असल्यामुळे या लेखा शीर्षकाखाली रुपये ६ कोटी ५२ लाख ८५ हजार इतकी वाढ सुचविली आहे. तसेच पाणी विकत घेण्यापोटी विविध संस्थांना रक्कम अदा करण्यासाठी रुपये ५२ कोटी ५ लाखाची तरतूद केली असताना प्रत्यक्षात रुपये ५५ कोटी ३० लाख द्यावे लागत असल्यामुळे ३ कोटी २५ लाख रुपयाची वाढ सुचविली आहे. तसेच मोरबे धरणाच्या अंतिम टप्प्याच्या कामाच्या अनुषंगाने देय असलेली रक्कम तरतूदीपेक्षा जास्त असल्यामुळे या लेखाशीर्षकाखाली १० कोटी रुपयाची वाढ सुचविली आहे. मोरबे धरणाच्या कामासंबंधात देयक देणे अनिवार्य असल्यामुळे सुधारीत तरतुदींमध्ये वरीलप्रमाणे वाढ करणे अपरिहार्य आहे.

सन २००६-२००७ चा अर्थसंकल्प "अ" आणि "क" च्या जमेच्या तरतुदींमध्ये जे फेरबदल करण्यात आले आहेत त्याचा तपशीलवार तक्ता खालीप्रमाणे आहे :-

## अर्थसंकल्प "अ" आणि "क" (जमेची बाजू)

**(तक्ता क्र. २)** **(रुपये लाखात)**

| अ. क्र. | लेखा शिर्ष | स्थायी समितीने प्रस्तावित केलेली तरतूद | घट | वाढ | सर्वसाधारण सभने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १. | उपकर | १४०००.०० | | ५००.०० | १४५००.०० |
| २. | मुं.म.प्रा.वि. प्राधिकरण कडून कर्ज | २०००.०० | | १३००.०० | ३३००.०० |
| ३. | जल राखीव निधीतून खर्चाकडे वर्ग | ०.०० | | १५००.०० | १५००.०० |
| ४. | मलनि:स्सारण राखीव निधीतून खर्चाकडे वर्ग | ०.०० | | १५००.०० | १५००.०० |
| | **एकुण** | | | ४८००.०० | |

उपकराच्या बाबतीत सन २००५-२००६ करीता १२५ कोटी ५० लाख रुपयाचे जे उद्दीष्ट महानगरपालिकेने ठेवले होते ते उद्दीष्ट साध्य झाले आहे. प्रशासनाने जेव्हा ११७ कोटी ५० लाख रुपये इतका महसूल प्राप्त होईल असे प्रस्ताविले होते. तेव्हा १२५ कोटी रुपये मिळू शकतील

असे सभागृहाचे ठाम मत होते. प्रशासनाने अथक परिश्रम घेऊन उपकराची वसूली काटेकोरपणे केल्यामुळे अपेक्षीत महसूल प्राप्त झाला आहे. सन २००६-२००७ करीता आयुक्तांनी १३५ कोटी रुपये इतका महसूल प्राप्त होईल असे अपेक्षीत केले होते. मात्र, स्थायी समितीने त्यामध्ये रुपये ५ कोटीची वाढ करुन ती रुपये १४० कोटी इतके प्रस्तावित केले आहे. सन २००५-२००६ चा अनुभव लक्षात घेता सन २००६-२००७ मध्ये १४५ कोटी रुपये इतके उत्पन्न मिळण्याची खात्री वाटते म्हणून अपेक्षित उत्पन्नामध्ये ५ कोटी रुपयाची वाढ सुचविली आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पासाठी काढावयाच्या कर्जाच्या रकमेमध्ये रुपये १३ कोटीची वाढ प्रस्ताविली आहे. तसेच जल आणि मलनि:स्सारण राखीव निधीतून खर्चासाठी प्रत्येकी १५-१५ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. जेणेकरुन बेलापूर ते दिघ्यापर्यंत जलवाहिनी टाकण्याचे आणि वाशी, नेरुळ, ऐरोली येथील अत्याधुनिक पध्दतीने मलनि:स्सारण प्रक्रिया प्रकल्पाचे काम मार्गी लागेल. सन २००६-२००७ करीता मालकत्ता कराचे दर जरी वाढविले असले तरी करनिर्धारण मुल्य ४० टक्केने कमी करण्यात येणार असल्यामुळे राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर यापोटी शासनाला द्यावयाच्या रकमेमध्ये रुपये १० कोटीची बचत होणार आहे. त्यामुळे खालील तक्त्यामध्ये तपशीलवार दर्शविल्याप्रमाणे खर्चामध्ये घट होईल. तसेच ग्रामीण मलनि:स्सारण योजना या लेखाशीर्षकाखाली केलेल्या तरतूदीचे विकेंद्रीकरण करुन त्यामधील २ कोटी ७९ लाख रुपये स्वतंत्ररित्या झोपडपट्टी भागामध्ये मलनि:स्सारण वाहिन्या टाकण्याच्या कामासाठी नवीन लेखाशीर्षक निर्माण करुन त्या शीर्षकाखाली तरतूद केली आहे.

**अर्थसंकल्प "अ" आणि "क" (खर्चाची बाजू)**

**(तक्ता क्र. ३)** **( रुपये लाखात)**

| अ.क्र. | लेखा शिर्ष | स्थायी समितीने प्रस्तावित केलेली तरतूद | घट | वाढ | सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १. | राज्य शिक्षण कर शासन भरणा | २०१०.०४ | ९००.०० | | १११०.०४ |
| २. | रोजगार हमी कर शासन भरणा | ४३५.१२ | १००.०० | | ३३५.१२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **३.** | ग्रामिण मलनिःस्सारण योजना | ९५९.०० | २७९.०० | | ६८०.०० |
| **४.** | झोपडपट्टी मलनिःस्सारण वाहिन्यांची सुधारणा /टाकणे | ०.०० | | २७९.०० | २७९.०० |
| | **एकुण** | | **१२७९.००** | २७९.०० | |

तक्ता क्र. २ आणि ३ मध्ये तपशीलवार नमूद केल्याप्रमाणे महसूलामध्ये वाढ करुन आणि खर्चामध्ये घट करुन उपलब्ध झालेली रुपये ६० कोटी ७९ लाख इतकी रक्कम सन २००६-२००७ चा अर्थसंकल्प "अ आणि क" मधील खालील तक्ता क्र. ४ आणि ५ मध्ये तपशीलवार दर्शविलेल्या लेखा शीर्षकाखाली तरतूद करण्यात आली आहे :-

## अर्थसंकल्प "अ" आणि "क" (खर्चाची बाजू)

**(तक्ता क्र. ४)** **(रुपये लाखात)**

| अ.क्र. | लेखा शिर्ष | स्थायी समितीने प्रस्तावित केलेली तरतूद | घट | वाढ | सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १. | अनधिकृत बांधकामे हटविणे खर्च | १००.०० | | ५०.०० | १५०.०० |
| २. | किटकनाशके खरेदी | १८०.०० | | २५.०० | २०५.०० |
| ३. | औषधे खरेदी | २२०.०० | | २५.०० | २४५.०० |
| ४. | शिक्षण मंडळास अनुदान | १३००.०० | | ३००.०० | १६००.०० |
| ५. | सुधारणा - मलनिस्सारण केंद्र | ४०००.०० | | ३०००.०० | ७०००.०० |
| ६. | धरण विकत घेणे | २५००.०० | | ७००.०० | ३२००.०० |
| | **एकुण** | | | **४१००.००** | |

ज्या अर्थसंकल्पीय तरतूदींमध्ये मोठया प्रमाणात वाढ करण्यात आली आहे त्यामध्ये शिक्षण मंडळाला अनुदान म्हणून ३ कोटी रुपयाची वाढ करण्यात आली आहे. आगामी वर्षामध्ये अत्याधुनिक तत्वावर मलनि:स्सारण प्रक्रिया प्रकल्पाचे काम जलद गतीने व्हावे म्हणून यासाठी केलेली ४० कोटी रुपयाची तरतूद रुपये ३० कोटीने वाढवून ती रुपये ७० कोटी इतकी करण्यात आलीआहे. तसेच मोरबे धरणाच्या कामासाठी आवश्यक असलेली रक्कम देता यावी म्हणून केलेली तरतूद रुपये २५ कोटी ही रुपये ७ कोटने वाढवून रुपये ३२ कोटी इतकी करण्यात आलेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमासाठी नव्याने आगार विकसीत करण्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असल्यामुळे खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे नव्याने १२ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच परिवहन उपक्रमासाठी कोटी इतकी करण्यात आली आहे. तसेच मोरबे धरणाच्या कामासाठी आवश्यक असलेली रक्कम देता यावी म्हणून केलेली तरतूद रुपये २५ कोटी ही रुपये ७ कोटीने वाढवून रुपये ३२ कोटी इतकी करण्यात आलेली आहे.

नव्याने बस खरेदी करता याव्यात म्हणून प्रस्तावित केलेल्या रुपये १ कोटी अनुदानामध्ये रुपये ५ कोटीची वाढ करुन ती रुपये ६ कोटी इतकी करण्यात आलेली आहे.

**<u>नवीन लेखाशिर्ष</u>**

**(तक्ता क्र. ५)** **( रुपये लाखात)**

| अ.क्र. | लेखा शिर्ष | स्थायी समितीने प्रस्तावित केलेली तरतूद | घट | वाढ | सर्वसाधारण सभने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १. | परिवहन उपक्रम डेपोकरीता जमिन विकत घेणे व डेपो विकसीत करणे (नवीन) | ०.०० | | १२००.०० | १२००.०० |
| २. | परिवहन उपक्रम अनुदान | १००.०० | | ५००.०० | ६००.०० |
| | **एकुण** | | | **१७००.००** | |

कोणतीही कर वाढ न करता आगामी वर्षासाठी उपकर व मालमत्ताकर आणि इतर करापोटी यावयाच्या उत्पन्नाचा जो इष्टांक गृहित धरला आहे तो इष्टांक साध्य करण्यासाठी मा. आयुक्त, संबंधीत अधिकारी आणि कर्मचारी विशेष प्रयत्न करतील असा मला विश्वास वाटतो.

सन २००५-२००६ चा सुधारीत अर्थसंकल्प "अ आणि क" यामध्ये केलेले फेरबदल आणि सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्प "अ आणि क" यामध्ये केलेले फेरबदल करुन मंजूर केल्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्प "अ आणि क" करीता

आरंभीची शिल्लक रुपये १३२ कोटी १९ लाख २७ हजार जमेस धरुन एकूण महसूली व भांडवली उत्पन्न रुपये ६३६ कोटी ८५ लाख ४८ हजार तर एकूण महसूली आणि भांडवली खर्च रुपये ६३६ कोटी ८१ लाख ६३ हजार आणि वर्षाअखेर रुपये ३ लाख ८५ हजार शिल्लक राहील. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील करदाते आणि नागरीकांना सन २००६-२००७ करीता निवासी मालमत्ता करामध्ये किमान २० टक्के सुट मिळणार असल्यामुळे ते या अर्थसंकल्पाचे निश्चितच स्वागत करतील. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते.

जय हिंद ..... जय महाराष्ट्र .....

**दिनांक २९.०३.२००६.**

**नवी मुंबई महानगरपालिका.**

**मनिषा शशिकांत भोईर.**
**महापौर,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**